आजचा शुभ विचार

"माणसाला दारिद्र्याची नव्हे तर त्याच्या दुर्गुणांची लाज वाटली पाहिजे."
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-35 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Saturday 07 June 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ३५ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शनिवार, दि. ०७ जुन २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये

## ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली पहिली प्रतिक्रिया

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) या दोन्ही पक्षांची युती होणार असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. त्याकरता दोन्ही पक्षांच्या नेतेमंडळींकडून प्रयत्न सुरू असल्याचंही म्हटलं जातंय. फक्त या युतीकरता कोणता पक्ष किंवा पक्षनेतृत्त्व पुढाकार घेणार याची वाट पाहिली जात आहे. दरम्यान, या संभाव्य युतीबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत बोलकी प्रतिक्रिया दिली आहे. ते आज गडचिरोली येथे माध्यमांशी बोलत होते. उद्धव ठाकरेंकडून कोणताही अधिकृत प्रस्ताव आला तर त्यावर राज ठाकरेंकडून विचार केला जाईल, अशी मनसेची भूमिका आज संदीप देशपांडे आणि अविनाश जाधव यांनी व्यक्त केली. तर, महाराष्ट्रातील जनतेच्या मनात जे आहे, ते होईल, अशी सकारात्मक भावना उद्धव ठाकरेंनी आज बोलून दाखवली. तर, या दोन्ही नेत्यांमध्ये एव्हाना फोनवरू चर्चा झालीही असेल, असं सूचक वक्तव्य आज संजय राऊतांनी केलं होतं. त्यामुळे या दोन्ही पक्षांची युती होण्याची शक्यता अधिक प्रबळ होत जातेय. याबाबत आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही विचारण्यात आलं. देवेंद्र फडणवीस म्हणाले, " मी यावर काय प्रतिक्रिया देणार आहे? माझा काय संबंध येतो त्यात? त्यामुळे ते आपसांत ठरवतील, की यांनी साथ द्यायचीय, त्यांनी प्रतिसाद द्यायचा की नाही."

### मी उचितवेळी बोलेन

ते पुढे म्हणाले, "आता तरी त्यावर प्रतिक्रिया देण्यालायक काही आहे असं मला वाटत नाही. त्यामुळे मी योग्यवेळी बोलेन. मी माझा राजकीय अनुभव असा वारंवार सांगत नसतो. तो उचितवेळी सांगत असतो" , असंही त्यांनी पुढे स्पष्ट केलं.

### एकनाथ शिंदेंनी बोलणं टाळलं

दरम्यान, हाच प्रश्न राज्याचे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यानाही विचारण्यात आला. मात्र, त्यांनी या प्रश्नावर उत्तर देणं टाळलं. महायुती भक्कमपणे काम करेल असंच ते म्हणाले.

## निवडणुकीत यशासाठी पदाधिकाऱ्यांना कानमंत्र भाजप तर्फे उत्तर महाराष्ट्रात विशेष कार्यशाळेचे आयोजन

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------




स्थानिक पातळीवर जे कोणी पदाधिकारी, कार्यकर्ते येतील, त्यांना भाजपमध्ये प्रवेश द्या... स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपचे जास्तीतजास्त उमेदवार निवडून आले पाहिजेत... बूथ (मतदान केंद्रस्तरीय) अध्यक्षांनी आपल्या परिसरात फिरावे... नव्या जिल्हाध्यक्षांनीही कार्यालयात बसू नये... नेत्यांच्या मागे फिरताना कोणी आढळल्यास त्याला उमेदवारी दिली जाणार नाही... अशा सूचना भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उत्तर महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांना दिल्या. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, गुरुवारी येथे भाजपची उत्तर महाराष्ट्र विभागाची कार्यशाळा पार पडली. यावेळी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, राधाकृष्ण विखे-पाटील आदींनी मार्गदर्शन केले. उत्तर महाराष्ट्रातील ६५० पदाधिकारी कार्यशाळेत सहभागी झाले होते. यावेळी प्रमुख नेत्यांनी केलेल्या मार्गदर्शनाची माहिती उपस्थित पदाधिकाऱ्यांनी दिली.

निवडणुकीआधी सर्वपक्षीय कार्यकर्त्यांना पक्षात सामावून घेण्यावर प्रदेशाध्यक्षांनी जोर दिला. जिल्हाध्यक्षापासून ते बूथ अध्यक्षापर्यंत सर्वांनी सक्रिय व्हावे. ही कार्यकर्त्यांची निवडणूक असून पक्ष तुमच्या पाठिशी ठामपणे उभा असल्याचे बावनकुळे यांनी नमूद केल्याचे सांगितले जाते. यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बावनकुळे यांनी मोदी सरकारला ११ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त या काळात सरकारने केलेले काम, मोदी सरकार येण्यापूर्वीची परिस्थिती, मोदी सरकारच्या काळात महाराष्ट्रात झालेले बदल, पायाभूत सुविधा, गोरगरिबांच्या कल्याणासाठीच्या योजना, फडणवीस सरकारचे १०० दिवसातील कार्य आणि पुढील दीडशे दिवसांचा संकल्प २५ जूनपर्यंत घरोघरी पोहोचविला जाणार असल्याचे सांगितले. विखे पाटील यांनी संघटनात्मक जबाबदारी आणि महाजन यांनी केंद्र व राज्य सरकारच्या प्रभावी योजनांची माहिती दिली. विधानसभा निवडणुकीत उत्तर महाराष्ट्रात भाजपला अधिक जागा मिळाल्या होत्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्यापेक्षा कित्येक पट अधिक चांगली कामगिरी नोंदविण्याची आवश्यकता त्यांनी मांडली. राज्यात ८० संघटनात्मक नेमणूका झाल्या असून १२०० पेक्षा जास्त मंडल रचना पूर्ण झाली आहे. उत्तर महाराष्ट्रातही ही प्रकिया पूर्ण झाली असल्याचे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. संकल्प से सिद्धीतक या उपक्रमांतर्गत राज्य शासनाने घेतलेले निर्णय, राबविलेल्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे, वृक्षारोपण आदी उपक्रम राबविले जाणार आहेत. कार्यशाळेत संघटनात्मक रचना आणि कार्यकारिणी निवड यावर काम करण्यात आले. मंडलनिहाय रचना कशी असेल, याविषयी माहिती देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

## 'जे ब्रिटिशांना जमलं नाही ते नरेंद्र मोदींनी करुन दाखवलं', जम्मू आणि काश्मीरच्या मुख्यमंत्री ओमर अब्दुल्लांचा कौतुकाचा वर्षाव

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज जम्मू आणि काश्मीरमध्ये तब्बल ४६ हजार कोटी रुपयांच्या विकास कामांचं भूमिपूजन केलं. याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ऐतिहासिक चिनाब पूल, अंजी पूल आणि उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंकचं उद्घाटन केलं. तसेच काश्मीरला जाणाऱ्या पहिल्या वंदे भारत एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवला. दरम्यान, या कार्यक्रमावेळी जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी पंतप्रधान मोदींवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. जम्मू आणि काश्मीरमधील कटार येथे बोलताना ओमर अब्दुल्ला म्हणाले की, "अनेक लोकांनी काश्मीरमध्ये रेल्वे आणण्याचे स्वप्न पाहिले होते. ब्रिटिशांनीही काश्मीरला रेल्वेने जोडण्याचे स्वप्न पाहिले होते पण ते अयशस्वी झाले. झेलम नदीच्या काठावर असलेल्या उरी येथून जम्मू आणि काश्मीरला रेल्वेच्या माध्यमातून देशाशी जोडण्याची त्यांची योजना होती. ब्रिटिश जे साध्य करू शकले नाहीत ते तुमच्या (मोदी) हातून घडले आणि काश्मीर देशाच्या इतर भागाशी जोडले गेले." ओमर अब्दुल्ला यांनी हे विधान केले तेव्हा, व्यासपीठावर पंतप्रधान नरेंद्र मोदी जम्मू आणि काश्मीरचे राज्यपाल मनोज सिन्हा देखील उपस्थित होते. पुढे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी एक मनोरंजक गोष्ट सांगितली. पंतप्रधान मोदींना उद्देशून ते म्हणाले की, "जेव्हा तुम्ही पहिल्यांदा पंतप्रधान झालात, तेव्हा तुम्ही देवीच्या आशीर्वादाने येथे कटरा रेल्वे स्टेशनचे उद्घाटन केले. त्यानंतर तुम्ही सलग तीन वेळा निवडणुका जिंकून पंतप्रधान झालात. त्यावेळी आमचे उपराज्यपाल मनोज सिन्हा साहेब तुमच्यासोबत रेल्वे राज्यमंत्र्याची जबाबदारी सांभाळत होते. जर तुम्ही मनोज सिन्हा साहेबांकडे पाहिले तर त्यांना देवीच्या आशीर्वादाने बढती मिळाली. जर तुम्ही माझ्याकडे पाहिले तर माझे डिमोशन झाल्याचे पाहायला मिळेल. त्यावेळी मी राज्याचा मुख्यमंत्री होतो, आता मी केंद्रशासित प्रदेशाचा मुख्यमंत्री आहे. मला आशा आहे की, तुमच्या हातून जम्मू आणि काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा मिळेल." मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी यावेळी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजयपेयी यांचेही आभार मानले. ते म्हणाले, "या प्रसंगी, मी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचा उल्लेख न करणे आणि आभार न मानणे चूक ठरेल. या प्रकल्पाची पायाभरणी झाली तेव्हा मी आठवीत शिकत होतो. आता मी ५५ वर्षांचा आहे आणि अखेर त्याचे उद्घाटन झाले आहे. अटलबिहारी वाजपेयींनी याला 'राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रकल्पाचा' दर्जा दिला आणि त्याचे बजेट वाढवले त्यामुळेच हा प्रकल्प शक्य झाला."

## वादग्रस्त सुधाकर बडगुजर यांच्या प्रवेशासाठी भाजप उतावीळ का ?

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



भाजपमध्ये कोणत्याही वादग्रस्त, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीला थारा दिला जाणार नाही, अशी डरकाळी वेळोवेळी फोडणारे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे शिवसेनेतून (उद्धव ठाकरे) हकालपट्टी झालेले उपनेते सुधाकर बडगुजर यांच्या बाबतीत मात्र स्थानिकांचा विरोध असतानाही भाजप प्रवेशासाठी पायघड्या घालू पाहत आहेत. बडगुजर यांच्यावर विविध प्रकारचे १७ गुन्हे दाखल असून कारवाई टाळण्यासाठी ते भाजपमध्ये येण्याची धडपड करीत असल्याकडे पक्षाचे स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांनी लक्ष वेधले असतानाही साधनशुचितेचा वारंवार डांगोरा पिटणाऱ्या भाजपची अशी कोणती अपरिहार्यता निर्माण झाली आहे, असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे.

मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी सलीम कुत्ताबरोबर सुधाकर बडगुजर यांनी पार्टी केल्याचा आरोप मागील वर्षी भाजपचे नितेश राणे यांनी विधानसभेत छायाचित्र दाखवून केला होता. तेव्हा सरकारने विशेष पथकामार्फत चौकशी करून आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. त्यावेळी भाजपचे स्थानिक आमदार तसेच पदाधिकारी बडगुजर यांच्यावर तुटून पडले होते. विधानसभा निवडणुकीत भाजपकडून बडगुजर यांच्याविरोधातील प्रचारात हाच मुद्दा गाजला होता. वादग्रस्त बडगुजर विरुध्द सौम्य सीमा हिरे या लढतीत मतदारांनी हिरे यांच्या बाजूने कौल दिला. आणि बडगुजर यांना सलग दुसऱ्यांदा विधानसभा निवडणुकीत पराभव स्वीकारावा लागला. आता त्याच बडगुजर यांचे असे कोणते गुण भाजप प्रदेशाध्यक्षांना भावले की, स्वपक्षीय आमदार सीमा हिरे यांनी केलेल्या विरोधाकडे दुर्लक्ष करण्याची गरज त्यांना वाटू लागली आहे. हिरे यांनी बडगुजर यांच्याविरोधात निवडणूक लढवली असल्याने समज-गैरसमज दूर होण्यास वेळ लागतो. त्याला फार महत्व देण्याची गरज नाही, अशी मल्लीनाथी करुन बावनकुळे यांनी एकप्रकारे हिरे यांनाच फटकारले. राजकारणात आरोप-प्रत्यारोप होतात. न्यायालयात आरोप सिद्ध होत नाहीत, तोपर्यंत संबंधित व्यक्ती गुन्हेगार नसतो. याचा विचार करून कुणाचेही मूल्यमापन व्हायला हवे, असे सूचक विधानही बावनकुळे यांनी केले असल्याने बडगुजर यांना स्थानिक पातळीवर कोणाचाही आणि कितीही विरोध असला तरी त्यांचा भाजप प्रवेश निश्चित मानला जात आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी यांच्यापुढे तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करण्याशिवाय पर्याय राहतो. बडगुजर यांना प्रवेश देण्यासाठी उतावीळ होण्याची काही कारणे आहेत. त्यात आगामी कुंभमेळा हे त्यापैकी एक आहे. कुंभमेळ्यासाठी महापालिकेवर एकहाती सत्ता असणे भाजपसाठी महत्वाचे आहे. त्यामुळेच महापालिका निवडणुकीत एकेक जागा जिंकण्यासाठी आतापासूनच त्यांचे प्रयत्न सुरु झाले आहेत. बडगुजर हे आपल्याबरोबर काही माजी नगरसेवकही घेऊन येतील, असा भाजपचा होरा आहे. त्यातच महापालिकेतील म्युन्सिपल कर्मचारी सेनेचे अध्यक्ष असलेले बडगुजर बडे ठेकेदार असल्याने कुंभमेळ्याच्या दृष्टीने पालिकेतील ठेकेदारीचे गणित सोडविण्याचा प्रयत्नही भाजपकडून निश्चितच होणार. दुसरीकडे, बडगुजर हे अनेक गुन्ह्यांमध्ये अडकले असल्याने तसेच त्यांच्या मुलावरही माहिती अधिकार कार्यकर्त्यांवरील हल्ल्याप्रकरणात गुन्हा दाखल असल्याने या सर्व गुंत्यातून सुटण्यासाठी भाजप प्रवेशाशिवाय पर्यायच नसल्याचे चित्र आहे. त्यामुळेच ठाकरे गटातील खासदार संजय राऊत यांच्या अगदी जवळचे असूनही त्यांनी जाहीरपणे पक्षाविरुध्द नाराजी व्यक्त करणे आणि पक्षाचा रोष ओढवून घेणे, ही जाणीवपूर्वक केलेली कृती मानली जात आहे.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

संपादकीय

# चीन-पाक कॉरिडॉरमध्ये अफगाणचा प्रवेश

चीन-पाक इकॉनॉमिक कॉरिडॉर या भारतासाठी डोकेदुखी ठरू पाहणाऱ्या भागीदारीत आता अफगाणिस्तानची भर पडली आहे. चीन हा कॉरिडॉर त्रिपक्षीय विकास योजना म्हणून भासवत असला तरी भारताशी असलेले वैर आणि विस्तारवाद हा त्यामागील छुपा अजेंडा आहे. हा कॉरिडॉर भारताच्या हद्दीत येणाऱ्या पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्याने सार्वभौमत्व आणि सुरक्षेचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. चीनने व्यापारवृद्धीसाठी, दक्षिण आशियाई देशांना अधिक जवळ आणण्यासाठी आणि पाकिस्तानमधील पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी एक मोठा द्विपक्षीय प्रकल्प राबवला आहे. २०१५ मध्ये सुरू झालेला हा प्रकल्प चीन-पाक इकॉनॉमिक कॉरिडॉर म्हणून प्रसिद्ध असा हा पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. पाकिस्तानच्या पायाभूत सुविधांचा विकास करताना चीनची ऊर्जा आयात आणि व्यापार वाढवणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये ग्वादर आणि कराचीमधील बंदरांना उत्तर पाकिस्तान आणि चीनच्या शिनजियांग प्रदेशाशी जोडणारे आधुनिक वाहतूक नेटवर्क समाविष्ट आहे. बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह अंतर्गत या कॉरिडॉरमध्ये चीनने सुमारे ६५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. ही गुंतवणूक प्रामुख्याने ऊर्जा प्रकल्पांसह पायाभूत सुविधांच्या विकासावर केंद्रित आहे. याचा मोठा भाग वीज निर्मितीकडे जातो. २०२१ मध्ये तालिबानने अफगाणिस्तानवर पुन्हा नियंत्रण मिळवल्यानंतर २०२५ पर्यंत इतर सर्व देशांप्रमाणे चीनने पुनर्स्थापित इस्लामिक अमिरातीला मान्यता दिली नाही, परंतु देशात त्यांच्या दूतावासाला काम करण्याची परवानगी दिली. मान्यता नसतानाही चीन तालिबान सरकारशी व्यापार, गुंतवणूक आणि मदतीच्या मुद्द्यांवर वाटाघाटी करतो. अफगाणिस्तानच्या खाण क्षेत्रातील सर्वात मोठे गुंतवणूकदार म्हणजे उझबेकिस्तान, तुर्की, चीन आणि इराणमधील कंपन्या; ज्यांनी तेल आणि वायू, सिमेंट प्रकल्प आणि तांबे, सोने आणि लोखंडाच्या खाणींमध्ये गुंतवणूक केली आहे. अफगाणिस्तानमध्ये तेलाचे साठेदेखील आहेत. विशेषतः उत्तर अफगाणिस्तानमध्ये, विशेषतः बल्ख आणि जाव्झान प्रांतांमध्ये अंदाजे १.८ अब्ज बॅरल तेल आहे, चीनची या तेलसाठ्यांवर आणि खाणींवर नजर आहे. या दृष्टीने पाऊल टाकत चीनने अफगाणिस्तानला चीन-पाक इकॉनॉमिक कॉरिडॉरमध्ये सामील करून घ्यायचा निर्णय घेतला आहे. समुद्र आणि जमिनीवर आधारित चीनच्या कॉरिडॉरचा मुख्य उद्देश मध्यपूर्वेतून चीनच्या ऊर्जाआयातीचा मार्ग सुरक्षित आणि कमी अंतराचा करणे हा आहे. मलेशिया आणि इंडोनेशिया दरम्यान मलाक्का सामुद्रधुनीतून जाणारा विद्यमान मार्ग युद्धाच्या प्रसंगी बंद होऊ शकतो. त्यामुळे चीनच्या ऊर्जा-अवलंबित अर्थव्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो. पाकिस्तान आणि चीनने चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर अफगाणिस्तानपर्यंत विस्तारित करण्यास सहमती दर्शवली आहे. तिन्ही राष्ट्रांमधील त्रिपक्षीय सहकार्य अधिक दृढ करण्याचे हे प्रयत्न असल्याचे चीन भासवत असला तरी भारताशी असलेले वैर आणि विस्तारवाद हा चीनचा छुपा अजेंडा आहे. चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर हा भारताच्या हद्दीत येणाऱ्या पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्याने भारतासाठी सार्वभौमत्व आणि सुरक्षेचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. सीपीईसीचे काम भारताच्या सहभागाशिवाय प्रगतिपथावर आहे, जे गंभीर चिंतेचा विषय बनले आहे. चीनच्या पथ्यावर पडलेली आणखी एक घटना म्हणजे अलीकडच्या एका अहवालात पाकिस्तानने त्याच्या प्रादेशिक पाण्यात मोठ्या प्रमाणात तेल आणि वायूचे साठे शोधले असल्याचे सूचित केले आहे. हे जगातील सर्वात मोठ्या साठ्यांपैकी एक असू शकतात. युनायटेड स्टेट्स एनर्जी इन्फॉर्मेशन ॲडमिनिस्ट्रेशनच्या मते पाकिस्तानकडे नऊ अब्ज बॅरलपेक्षा जास्त पेट्रोलियम तेल आणि १०५ ट्रिलियन घनफूट नैसर्गिक वायूचे साठे आहेत. हे लक्षात घेता भारताला या कॉरिडॉर त्रिकुटापासून सावध राहावे लागेल. तालिबानच्या नेतृत्वाखालील इस्लामिक अमिरात ऑफ अफगाणिस्तान आता सत्तेमध्ये चौथे वर्ष पूर्ण करण्याच्या तयारीत आहे. गेल्या चार वर्षांमध्ये या राजवटीपर्यंत भारताची पोहोच हळूहळू वाढत गेली. आता ती अधिक थेट पण सावध व्यावहारिक सहभागामध्ये रूपांतरित झाली आहे. परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर आणि आयईएचे अंतरिम परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांच्यातील अलीकडच्या फोन कॉलने या भागीदारीतील एक महत्त्वाचा टप्पा गाठला. भारत-अफगाण दरम्यानचे हे व्यापारी संबंध चीन आणि पाकिस्तानला सलत आहेत. भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध केल्याबद्दल मुत्ताकी यांचे आभार मानले आणि दोन्ही देशांमध्ये अविश्वास निर्माण करण्याच्या प्रयत्नांवर विश्वास न ठेवल्याबद्दल कौतुक केले. याला पाकिस्तानने केलेल्या दिशाभूल करणाऱ्या दाव्यांचा अप्रत्यक्ष संदर्भ आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने तालिबानला मानवतावादी आणि विकास सहकार्य हळूहळू वाढवण्याचे वचन दिले आहे. या वर्षी जानेवारीमध्ये परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी दुबईमध्ये मुत्ताकी यांची भेट घेतली. ही दोन्ही बाजूंमधील सर्वोच्चस्तरीय बैठक होती. डिसेंबर २०२४ मध्ये हल्ले आणि प्रतिहल्ल्यांनंतर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील संबंध बिघडल्यानंतर ही बैठक होत आहे. काबूलमधील पाकिस्तानचा प्रभाव कमी झाल्यामुळे भारताला आपला सहभाग वाढवण्यासाठी आणि या प्रदेशात आपले धोरणात्मक आणि सुरक्षा हितसंबंध अधिक चांगल्या प्रकारे सुरक्षित करण्याची संधी मिळाली. व्यापारासाठी अफगाणिस्तानच्या चाबहार बंदराचे महत्त्व, अफगाणिस्तानला मानवतावादी मदत पोहोचवणे आणि काबूलला इस्लामाबादवरील अत्यधिक अवलंबित्वातून मुक्त करणे यानिमित्ताने भारताने सहकार्याचे एक पर्व सुरु केले. आता भारताने या बाबींवर भर देऊन अफगाणिस्तानशी व्यापार संबंध बळकट करण्याची आवश्यकता आहे. अर्थात असे असले तरी, या प्रदेशातील इतर देश, खासकरून चीन, तालिबान आणि अफगाणिस्तानशी संबंध प्रस्थापित करण्याकामी अधिक सक्रिय आहे. रशियाने अलीकडेच तालिबानला दहशतवादी संघटनांच्या यादीतून काढून टाकले आहे. इराण आणि मध्य आशियाई प्रजासत्ताक, जसे की कझाकस्तान, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, ताजिकिस्तान यांनीही अफगाणिस्तानशी संपर्क वाढवला आहे. तालिबानदेखील या घडामोडींचा फायदा घेत आहे, परस्पर हितसंबंधांवर आधारित तटस्थ परराष्ट्र धोरणाचा पुनरुच्चार करत आहे. चीन आपला आर्थिक कॉरिडॉर नजरेसमोर ठेऊन पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यामधील संबंध सुधारण्यासाठी मध्यस्थ म्हणून भूमिका पार पाडत आहे. म्हणूनच दोन पारंपरिक शत्रूंशी अफगाणिस्तानच्या वाढत्या जवळीकीकडे भारताला काटेकोर लक्ष द्यावे लागणार आहे. गेल्या काही दिवसांमध्ये भारताने अफगाणशी संपर्क वाढवला आहे. २७ एप्रिल रोजी परराष्ट्र मंत्रालयाच्या संयुक्त सचिवांच्या नेतृत्वाखालील भारतीय शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीनंतर मुत्ताकी पाकिस्तान आणि चीनशीही संवाद साधत आहेत. १० मे रोजी काबूलमध्ये पाकिस्तान आणि चीनच्या विशेष प्रतिनिधींच्या बैठकीनंतर पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री मोहम्मद इशाक दार आणि मुत्ताकी यांनी २०-२१ मे रोजी चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्याशी त्रिपक्षीय सल्लामसलत करण्यासाठी चीनमध्ये भेट घेतली. यावेळी परस्पर हितसंबंध आणि चांगल्या शेजाराच्या आधारावर संबंध विकसित करण्याच्या वचनबद्धतेचा तिन्ही बाजूंनी पुनरुच्चार केला. त्यांनी आर्थिक तसेच संपर्क राखण्याच्या आघाड्यांवर सहकार्य वाढवण्याचे ठरवले आणि चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर अफगाणिस्तानपर्यंत विस्तारण्यास सहमती दर्शवली. भारताच्या दृष्टीने या निर्णयाला महत्त्व आहे. ही उपद्रवी राष्ट्रे एकत्र येत असल्याने अफगाणिस्तानशी असलेले संबंध वाढवण्याच्या दृष्टीने भारताची कसोटी लागणार आहे. गेल्या साडेतीन वर्षांमध्ये अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील संबंध लक्षणीयरीत्या बिघडले आहेत. मात्र तरीही दोन्ही बाजू प्रश्न सोडवण्याचा आणि एकमेकांशी पुन्हा संपर्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहेत. भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षानंतर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानला पुन्हा आपल्या हद्दीत समाविष्ट करण्याचा चीनचा प्रयत्न भारतासाठी अडचणीचा ठरू शकतो. भारताशी प्रस्थापित केलेले चांगले संबंध अफगाणिस्तानला पाकिस्तानपासून स्वावलंबन मिळवून देतात; परंतु तालिबानशी असलेले संबंध आपल्याला हवे असलेले फायदे देऊ शकतात का, यावर भारताची कडक नजर असणे आवश्यक आहे. या आर्थिक कॉरिडॉरची भारताच्या दृष्टीने जमेची बाजू म्हणजे पाकिस्तानी आणि चिनी निवेदनांमध्ये सर्व प्रकारच्या दहशतवादाला विरोध आणि त्याचा सामना करण्याची त्यांची वचनबद्धता नमूद करण्यात आली. मुत्ताकी यांनी वांग यी यांच्यासोबतच्या द्विपक्षीय बैठकीत अफगाणिस्तानची भूमी त्यांच्या कोणत्याही शेजारी देशांविरुद्ध वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही, असेही वचन दिले. भारताला अफगाणिस्तानशी संबंध वाढवताना अल कायदासारख्या गटांच्या उपस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या धोक्याची जाणीवदेखील असली पाहिजे. अफगाणिस्तानमध्ये अजूनही अनेक दहशतवादी संघटना कार्यरत आहेत. त्यांचे भारताशी वैर जगजाहीर आहे. यामुळे नवी दिल्लीला मोठ्या धोक्यापासून सावध राहावे लागणार आहे.

# शेत मजुर धरणग्रस्तावर अन्याय; घराचा मावेजा २२८८ रुपये देऊन केले त्याचे समाधान

राजाराम संतुकराव सोनकांबळे
(रावणगांवकर )
हडपसर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



लेंडी प्रकल्प गोणेगांव कॅम्प संतोका गोविंद सोनकांबळे यांचे राहते घर क्रमांक १४६ असून त्यांचा घराचा मावेजा २२८८ रुपये टाकून बाराची नोटीस देण्यात आली परंतु त्याने त्याचा विरोध दर्शवून २००४ मध्ये लेंडी प्रकल्प ईठगयाळ कॅंप. येथे आमरण उपोषणाला बसले होते परंतू त्यांना तहसीलदार कदम, व कार्यकारी अभियंता अधीक्षक लिदकर साहेब , डिपटीइंजिनियर नरसापुरे ,यांनी तुमच्या घराच मावेजा जागेसकट देऊ अशी खोटी आश्वासन देऊन त्यांचं मरण उपोषण स्थगित करण्यात आलं.परंतु आतापर्यंत कोताही आधिकारी त्याच्या घरापर्यंत पोहचला नाही. उलट त्याना कोर्टात जायाचे सले दिले अखेर त्यानी सामाजिक न्यामंत्री राज्यमंत्री रामदास आठवले साहेबांची भेट घेऊन झालेल्या अन्यायाची संपुर्ण हकिगत सांगितले तेव्हा त्यानी सामाजिक न्यामंत्री या नात्याने जिल्हा अधिकारी कर्डिले साहेब यांना सामाजिक न्याय विभागाकडून खरोखर या माणसावर संतोका गोविंद सोनकांबळे यांच्यावर अन्याय झालेला आहे त्याची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. त्याचा घरचा मावेजा वाढून मिळणेबाबत असे नमूद करून त्यांना पत्र दिले आहे. अखेर साहेबांनी न्याय देतील का नाही या धर्मग्रस्तांना खात्री वाटत नाही न्यायाच्या प्रतीक्षेत आहे.

# शिरूर पोलिसांनी हरवलेल्या १३ अल्पवयीन मुली तर ४५ महीला व ३५ पुरुषांचा शोध घेवुन दिले नातेवाईकांच्या ताब्यात - संदेश केंजळे पोलिस निरीक्षक

## शिरूर पोलिसांची दमदार कारवाईचे नातेवाईक नागरिकांकडून होते कौतुक..

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------




शिरूर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने एक अत्यंत संवेदनशील आणि माणुसकीचा परिचय देणारी उल्लेखनीय कामगिरी पार पाडली आहे. जानेवारी २०२५ ते मे २०२५ या पाच महिन्यांच्या कालावधीत घरातून निघून गेलेल्या १३ अल्पवयीन बालिका, तसेच ४५ महिला व ३५ पुरुष असे एकूण ९३ मिसिंग व्यक्तींचा यशस्वी शोध घेत, त्यांना सुरक्षितपणे त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात सोपवण्यात आले आहे.

या कामगिरीमागे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या गुन्हे शोध पथकाची अथक मेहनत आणि संयम आहे. बालिकांच्या हरवण्याच्या घटनांकडे संवेदनशीलतेने पाहत, पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तांत्रिक विश्लेषण, बातमीदारांची माहिती, विविध भागांतून शोधकार्य राबवून, सर्व १३ अल्पवयीन मुली सुरक्षितपणे सापडल्या.

दरम्यान, शिरूर हद्दीतील अनेक महिला व पुरुष हरवले असल्याच्या तक्रारी देखील दाखल झाल्या होत्या. यामध्ये पोलीस हवालदार संपत खबाले, पोलीस अंमलदार सोनाजी तावरे, आकाश नेमाणे, पवन तायडे, आणि महिला अंमलदार सारिका माळी यांची 'मिसिंग पथकात' नेमणूक करण्यात आली होती. या पथकाने केवळ एका महिन्यात ४५ महिला व ३५ पुरुषांचा शोध घेऊन त्यांना त्यांच्या नातेवाईकांपर्यंत सुखरूप पोहोचवले. ही संपूर्ण मोहीम पोलीस अधीक्षक संदीप गिल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, तसेच पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आली. या कार्यामध्ये पुढील अधिकारी व कर्मचारी यांचा मोलाचा सहभाग होता शुभम चव्हाण, नाथसाहेब जगताप, विजय शिंदे, नितेश थोरात, निरज पिसाळ, सचिन भोई, निखील रावडे, अजय पाटील, रविंद्र आव्हाड, भाग्यश्री जाधव, मोनिका वाघमारे, प्रतिभा देशमुख, स्नेहल होळकर, गोदावरी धंदरे, परवीन पप्पुवाले, गीता सुळे, सारिका माळी आणि इतर अंमलदार. ही कामगिरी केवळ गुन्हेगारी तपासाचे एक उदाहरण नसून, पोलीस दलाच्या माणुसकीपूर्ण आणि जबाबदारीच्या भानाची प्रचिती देणारी आहे. शिरूर पोलीस ठाण्याच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून, या यशामागील प्रत्येक कर्मचाऱ्याचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# भाजपा किसान मोर्चा शेतकरी मित्र बिंदू शेठ शर्मा यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घेतली भेट; शेतकऱ्यांच्या विविध अडचणीवर झाली चर्चा.

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------



दि. ४ -६-२०२५ रोजी शेतकरी मित्र भाजपा किसान मोर्चा महामंत्री श्री बिंदू शेठ शर्मा यांनी महसूल मंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन शेतकऱ्यांच्या विविध अडचणी बोलून दाखवल्या व श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बिंदू शेठ शर्मा यांना असे आश्वासित केले की शेतकऱ्यांच्या अडचणी वेळीच सोडवले जातील लवकरच बैठक लावून अंमलबजावणी केली जाईल असे सांगितले.

१)-पंतप्रधान सन्मान निधी पैसे बँका कर्ज खात्यात वर्ग करून घेतात बेकायदेशीर आहे

२)-विमा अवकाळी दुष्काळी गारपीट चे पैसे बँका कर्ज खात्यात वर्ग करतात वर्ग करू नये तात्काळ शेतकऱ्यांना देण्यात यावे

३)-नुकसान झालेल्या पिकाचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई हेक्टरी एक लाख रुपये शेतकऱ्यांना देण्यात यावी

४)-सटाणा शहरातील अतिक्रमण काढून तात्काळ काम चालू करावे तसेच

५-)अवकाळी पाऊस प्रचंड प्रमाणात वारा चक्रीवादळ नैसर्गिक संकटामुळे तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर विद्युत पोल पडणे तारा तुटणे ट्रांसफार्मर जळणे ट्रांसफार्मर वीज पडणे या कारणास्तव वीस पुरवठा सतत खंडित होत आहे तात्काळ वीज पुरवठा सुरळीत करावा

६-)बँकांनी ज्या शेतकरी बांधवांनी एक रकमी योजनेत कर्ज परतफेड केली आहे त्यांनी तात्काळ पीक कर्ज द्यावे सिबिल स्कोर चेक करू नये असे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस साहेबांचे आदेश आहेत तात्काळ पीक कर्ज वितरित करणे तसेच ७)-रस्ते अतिक्रमण केलेले रस्ते शेतकरी बांधवांना साठी मोकळे करून सातबारा नोंद लावून देणे

८)-घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू परवाने देणे २६ मार्च २०२० च्या शासन परिपत्रकातील अनुक्रमांक चार तरतुदीनुसार वाळू उपलब्ध करून देणे ऑफलाइन परवाने देणे.

९)- बागलाण तालुक्यातील ज्या नागरिकांचे रेशन कार्ड आहे परंतु त्यांनी मिळत नाही त्यांना धान्य वितरित करणे.

१०) विमा भरलेल्या शेतकरी बांधवांना विम्याचा लाभ मिळवून देणे.

११) सटाणा शहरातील रस्ते तसेच तालुक्यातील रस्ते पाण्या पावसामुळे खराब झालेले तात्काळ रिपेरिंग करावे असे ११ मागण्यांचे जाहीर निवेदन बागलाण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आलेली आहे भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा प्रदेश महामंत्री शेतकरी मित्र बिंदू शेठ शर्मा. यावेळी बागलाण तालुक्यातील असंख्य शेतकरी उपस्थित होते या शेतकऱ्यांच्या उपस्थितीत निवेदन दिले.

# त्याग आणि बलीदानाचा सण : ईद अल-अज़हा

**प्रविण बागडे**
**नागपूर**



ईद-उल-अजहा किंवा बलिदानाची ईद हा एक मुस्लिम सण आहे. हा सण जगभर साजरा केला जातो. या दिवशी कुराणमधील बळीची घटना साजरी केली जाते. याच दिवशी अल्लाच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी पैगंबर इब्राहिमांनी आपला मुलगा इस्माईलचा बळी देण्याच्या इच्छेचा सन्मान केला. इब्राहिम आपल्या मुलाचे बलिदान देत होते, तथापि, अल्लाहने त्यांना एक कोकरू प्रदान केले जो त्यांनी त्यांच्या मुलाच्या जागी बळी द्यायचे होता कारण त्यांनी अल्लाहच्या नावाने स्वतःच्या मुलाचे बलिदान देण्याची इच्छा दर्शविली होती. या हस्तक्षेपाच्या स्मरणार्थ प्राण्यांचा विधीपूर्वक बळी दिला जातो. त्यांच्या मांसाचा काही भाग प्राणी अर्पण करणारे कुटुंब वापरतात, तर उर्वरित मांस गरीब आणि गरजूंना वाटले जाते. मिठाई आणि भेटवस्तू दिल्या जातात, लहान मुलांना भेटवस्तू किवा पैसे दिले जातात आणि विस्तारित कुटुंबातील सदस्यांना भेट दिली जाते आणि त्यांचे स्वागत केले जाते. या दिवसाला कधीकधी महान ईद देखील म्हटले जाते. हा सण कुर्बानीचा सण किंवा पवित्र हज यात्रेचा सण म्हणूनही ओळखला जातो.

बलिदानाचा सण हिजरीच्या शेवटच्या महिन्यात, झु-अल-हज मध्ये साजरा केला जातो. जगभरातील मुस्लिम या महिन्यात सौदी अरेबियातील मक्का येथे एकत्र येऊन हज साजरा करतात. या दिवशी ईद-उल-अजहाही साजरी केली जाते. खरे तर हा हजचा एक भाग आणि मुस्लिमांच्या भावनांचा दिवस आहे. जगभरातील मुस्लिमांचा एक गट मक्का येथे हज करतो, जो उर्वरित मुस्लिमांसाठी आंतरराष्ट्रीय भावनांचा दिवस बनतो. ईद-उल-अजहा चा शाब्दिक अर्थ त्यागाची ईद आहे, या दिवशी एखाद्या प्राण्याचा बळी देणे हा एक प्रकारचा प्रतीकात्मक बलिदान आहे.

हज आणि त्याच्याशी संबंधित विधी हजरत इब्राहिम आणि त्यांच्या कुटुंबाने केलेल्या कार्याची प्रतिकात्मक पुनरावृत्ती आहे. हजरत इब्राहिम यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी हाजरा आणि मुलगा इस्माईल यांचा समावेश होता. असे मानले जाते की हजरत इब्राहिमला एक स्वप्न पडले होते ज्यात ते आपला मुलगा इस्माईलचा बळी देत होते, हजरत इब्राहिम आपल्या दहा वर्षाच्या मुलगा इस्माईलला देवाच्या मार्गावर बलिदान देण्यासाठी निघाले. देवाने त्याच्या देवदूतांना पाठवून इस्माईल ऐवजी एका प्राण्याचा बळी देण्यास सांगितले, असा उल्लेख पुस्तकांमध्ये आहे. वास्तविक इब्राहिमकडून मागितलेला खरा त्याग हा त्याचाच होता, तो म्हणजे स्वतःला विसरून जा, म्हणजे आपले सुख-सुविधा विसरून स्वतःला मानवतेच्या सेवेत पूर्णपणे झोकून द्या. मग त्यांनी आपला मुलगा इस्माईल आणि आई हाजरा यांना मक्केत स्थायिक करण्याचा निर्णय घेतला. पण मक्का त्याकाळी वाळवंट होता, त्यांना मक्केत स्थायिक केल्यानंतर ते स्वतः मानवसेवेसाठी बाहेर पडले. अशाप्रकारे वाळवंटात स्थायिक होणे हा त्याचा आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा त्याग होता.

इस्माईल मोठा झाल्यावर एक काफिला तिथून निघून गेला आणि इस्माईलचा त्या काफिल्यातील एका तरुणीशी विवाह झाला, त्यानंतर वंश सुरू झाला. ज्यांना इतिहासात इस्माईल किंवा वानू इस्माईल म्हणून ओळखले जाते. हजरत मुहम्मद साहेब यांचा जन्म याच घराण्यात झाला. ईद-उल-अजहाचे दोन संदेश आहेत: पहिला, कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याने स्वार्थाच्या पलीकडे जाऊन मानवी उन्नतीसाठी स्वतःला गुंतवून घेतले पाहिजे. ईद-उल-अधा एका लहान कुटुंबात कसा नवीन अध्याय लिहिला गेला याची आठवण करून देतो. या दिवशी मशिदींमध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम एकत्र येतात. लाखो मुस्लिम पांढरे कुर्ता घालून ईदगाह किंवा मोठ्या मशिदीत ईदची नमाज अदा करतानाचे दृश्य खूप आनंददायी असते. नमाज अदा केल्यानंतर उंट, बकरी, खेचर, मेंढ्या इत्यादी चार पायांच्या प्राण्यांची कुर्बानी दिली जाते. या दिवशी मुस्लिम त्यांचे नवीन किंवा आवडते कपडे घालतात. महिला शॉर्टब्रेड कुकीजसह विशेष पदार्थ बनवतात. त्या कुटुंब आणि मित्रांसोबत एकत्र येतात. या दिवशी ईदची नमाज एकत्रितपणे अदा केली जाते. नमाज जमवण्यात महिलांचा सहभाग समुदायानुसार वेगवेगळा असतो. यात दोन भाग असतात, पहिल्या भागामध्ये सात तकबीर तर दुसऱ्या भागामध्ये पाच तकबीर असतात. शिया मुस्लिमांसाठी, सलात अल-ईद पाच दैनंदिन प्रार्थनेपेक्षा वेगळी असते कारण दोन्ही ईदच्या नमाजांसाठी इश्ना किंवा इकामा स्पष्टपणे केला जात नाही. नमाजानंतर इमाम उपदेश देतात. नमाज आणि उपदेशांच्या शेवटी, मुस्लिम एकमेकांना मिठी मारुन 'ईद मुबारक' म्हणत शुभेच्छा देत भेटवस्तूंची देवाणघेवाण करतात. अनेक मुस्लिम याप्रसंगी त्यांच्या गैरमुस्लिम मित्रांना, शेजारी, सहकारी आणि वर्गमित्रांना त्यांच्या ईद उत्सवात आमंत्रित करतात जेणेकरून त्यांना इस्लाम आणि मुस्लिम संस्कृतीची चांगली ओळख करून दिली जाते. इस्लामिक मान्यतेनुसार, बकरी ईदची नमाज ही दोन रकातची नमाज आहे, जी अजान आणि इकमतशिवाय जमावाने अदा केली जाते. या नमाजात अधिक तकबीर आहेत, सहसा पहिल्या रकातमध्ये ६ आणि दुसऱ्या रकातमध्ये ५, जरी वेगवेगळ्या इस्लामिक पंथांमध्ये ही संख्या थोडी वेगळी असू शकते. नमाजानंतर इमाम प्रवचन देतो, जे ऐकणे सुन्नत मानले जाते. मुस्लिमांना या दिवशी चांगले कपडे घालण्याचा, सुगंधी अत्तर लावण्याचा आणि मोकळ्या मैदानात किंवा मोठ्या मेळाव्यात नमाज अदा करण्याचा सल्ला दिला जातो. ईद-उल-अजहा दरम्यान लोकांना मांस वाटणे, ईदच्या पहिल्या दिवशी ईदच्या नमाजपूर्वी आणि ईदच्या तीन दिवसांत नमाजानंतर तकबीर म्हणणे हे या महत्त्वाच्या इस्लामिक सणाचे आवश्यक भाग मानले जातात.

ईदगाह किंवा मशीद नावाच्या खुल्या वक्फ मैदानावर मोठ्या मेळाव्यात ईदची नमाज अदा करण्यासाठी पुरुष, महिला आणि मुले यांनी त्यांचे उत्तम कपडे परिधान करावेत अशी अपेक्षा असते. ज्यांना परवडणारे श्रीमंत मुस्लिम त्यांचे सर्वोत्तम हलाल पाळीव प्राणी, सहसा गाय, कुर्बानी देऊ शकतात, परंतु प्रदेशानुसार उंट, बकरी किंवा मेंढी, इब्राहीमच्या एकुलत्या एका मुलाची बलिदान देण्याच्या इच्छेचे प्रतीक म्हणून. बलिदान दिले जाणारे प्राणी ज्याला अधिया म्हणतात, ज्याला पर्शियन-अरबी शब्द कुर्बानी देखील म्हणतात, विशिष्ट वय आणि गुणवत्तेचे मानक पूर्ण करावे लागतात अन्यथा तो प्राणी अस्वीकार्य बलिदान मानला जातो. एकट्या पाकिस्तानमध्ये २.० अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे अंदाजे दहा दशलक्ष प्राणी ईदच्या दिवशी बलिदान दिले जातात. बलिदान दिलेल्या प्राण्याचे मांस तीन भागांमध्ये विभागणे पसंत केले जाते. एक तृतीयांश कुटुंबात अबाधित राहते आणि एक तृतीयांश नातेवाईक, मित्र आणि शेजाऱ्यांना दिले जाते आणि उर्वरित एक तृतीयांश गरीब आणि गरजूंना दिले जाते. आज या प्रसंगी सर्व मुस्लिम बंधू आणि भगिनींना ईद-उल-अजहाच्या हार्दिक शुभेच्छा!

# मविप्र औद्योगीक प्रशिक्षण संस्थेत शिवराज्याभिषेक दिन साजरा

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------





शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधीत मंगल प्रभात लोढा मंत्री, कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रभरात हा उपक्रम उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. मविप्र औ प्र संस्था, नांदगाव येथे शिवराज्याभिषेक सोहळयासाठी स्थानिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील बोरसे तसेच विजय काकळीज होते. तर कार्यक्रमासाठी व्याख्याते म्हणून नांदगाव शहरातील मराठा विद्या प्रसारक समाजाचे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदगाव येथील प्राध्यापक बी.के.पवार हे मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनिषा वर्मा यांच्या ऑनलाईन भाषणाने झाली. यानंतर कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे तसेच भगवान विश्वकर्मा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. कार्यक्रमाचे व्याख्याते प्रा.बी.के.पवार यांनी पर्यावरण संरक्षण या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. पर्यावरणाचा होत असलेला र्हास, अवेळी पर्जन्यवृष्टी, जंगल तोड करून शहरे उभारणी तसेच कारखाने तसेच वाहनांमधील निर्माण होणारे प्रदूषण व त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम हे अत्यंत घातक असून यावर पर्याय म्हणून वेळीच सतर्क होऊन पर्यावरण संरक्षण करणे गरजेचे आहे आणि त्यासाठी आपण आपल्या स्वतःपासून सुरुवात करून जास्तीत जास्त झाडे लावून त्यांची देखभाल करणे तसेच परिसराची स्वच्छता ठेवणे तसेच नैसर्गिक संसाधनांचे जतन करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे आणि त्याचे पालन करणे हे काळाची गरज असल्याबाबत सांगितले या सोबतच व्याख्याते प्रा.बी.के.पवार यांनी नागरी कर्तव्य आणि शिष्टाचार आणि कुटुंब प्रबोधन, स्वदेशी विचारांचा प्रसार तसेच सामाजिक समरसता, या विषयांवर मौलिक मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्षीय भाषणात प्रमुख अतिथी विजय काकळीज यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्य संघटन करीत असताना तांत्रिक कौशल्यांचा वापर कसा केला. शिव काळापासून ते आजपर्यंत ज्या व्यक्तींकडे तांत्रिक कौशल्य आहेत अशा व्यक्तींना अनन्यसाधारण असे महत्त्व आहे त्यामुळेच तांत्रिक शिक्षण ही काळाची गरज असुन त्यासाठी आय टी आय हा उत्तम पर्याय असल्याचेही विशद केले यासोबतच शिवाजी महाराजांच्या काळातील वेगवेगळे प्रसंग सांगुन शिवरायांच्या जिवनपटाला उजाळा दिला.अध्यक्षीय भाषणानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ सभासद तसेच स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य निवृत्ती खालकर, प्रकाश घोटेकर, बाबुलाल सावंत, अरविंद बोरसे, संजय कदम,न्यू इंग्लिश स्कूल, नांदगाव शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती काळे, पर्यवेक्षक अविनाश साळुंके, होरायझन अकॅडमीच्या प्राचार्या पुनम मढे, बाह्य रुग्ण कक्षाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रज्ञा पगार, औ.प्र.संस्था प्राचार्य कैलास जाधव, उपप्राचार्य सोमनाथ ठाकरे या सोबतच विविध आस्थापनांचे शाखाप्रमुख तसेच प्रतिनिधी व संस्थेचे आजी माजी प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. यावेळी औ.प्र.संस्थेत वार्षिक अभ्यासक्रमासोबत इतर उपक्रम राबविले जातात अशा उपक्रमांमधील काही निवडक प्रकल्प प्रदर्शनासाठी ठेवलेले होते. यामध्ये द्वीतीय वर्षे जोडारी विभागातील प्रशिक्षणार्थींनी व्यवसाय निदेशक रमेश बोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली बनवलेल्या प्रकल्पांचे प्रात्यक्षिके करून दाखवले काही प्रकल्प हे यांत्रिकी व विद्युत शाखेचे मिश्र प्रकल्प प्रशिक्षणार्थींनी अतिशय कुशलतेने बनवलेले होते व यावेळी प्रत्येक प्रकल्पाची, प्रात्यक्षिकाची सविस्तर माहिती मान्यवरांना दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य कैलास जाधव, सुत्रसंचालन राजेंद्र चव्हाण तर आभारप्रदर्शन सागर बोरसे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाखेतील सर्व निदेशक, निदेशकेतर सेवकवृंद व प्रशिक्षणार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दहिवेल येथे दुग्धअभिषेक व पुष्पहार अर्पण करून शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------




दि. ६ जून शुक्रवार रोजी दहिवेल येथे सकाळी नऊ वाजेला शिवभक्तांनी शिवस्मारकावर जाऊन दुग्ध अभिषेक करून पुष्पहार अर्पण करत शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. गेल्या अनेक वर्षापासून दहिवेल येथील शिवतीर्थ चौकातील तरुण शिवप्रेमी हा पवित्र आणि ऐतिहासिक दिवस मोठ्या उत्साहात साजरा करत असतात. यावेळी उपस्थित शिवप्रेमी शिवमय वातावरणात शुभेच्छा देतात आणि महाराजांच्या ऐतिहासिक कामगिरीची यानिमित्त दीर्घ चर्चा घडून येते. यामुळे नव्या पिढीला प्रेरणा मिळते सहा जून १९७४ रोजी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक झाला. संपूर्ण हिंदुस्तानाच्या साक्षीने मोठ्या उत्साहात साजरा झालेल्या या ऐतिहासिक दिवशीच महाराजांना छत्रपती हे पद मिळाले आणि ते संपूर्ण हिंदुस्तानचे राजे म्हणून घोषित झाले. छत्रपती शिवरायांनी मुघल राजवट भुईसपाट केल्यावर मराठा साम्राज्याची घोषणा केली ती याच दिवशी. या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आजच्या दिवसाला मोठे महत्त्व प्राप्त झाले. राजमाता जिजाऊ च्या मार्गदर्शनाने आणि आशीर्वादाने शिवबा राजांच्या उत्तुंग कामगिरीतून शहाजी महाराजांनी पाहिलेले दिव्य स्वप्न साकार झाले. यावेळी शिवराज्याभिषेक सोहळ्याला दहिवेल गावातील ग्रामपंचायत चे ग्राम विस्तार अधिकारी श्री अशोक बच्छाव, सरपंच प्रकाश वळवी, उपसरपंच श्री नंदकुमार महाले, व शिवप्रेमी श्री आनंदा शिवलाल बच्छाव, मा.प्राचार्य श्री अरविंद दहिविलकर सर, श्री अरुण नारायण बच्छाव, धर्मवीर संभाजी महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष श्री संदीप बच्छाव, संचालक श्री संजय कालेश्वर बच्छाव, श्री किशोर बच्छाव, श्री दिनेश गुरव, सोनू बच्छाव, प्रमोद पान पाटील, मनोहर बच्छाव, आधी शिवप्रेमी उपस्थित होते.

# मुंगसे येथे स्वामी विवेकानंद संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयातील 187 विद्यार्थ्यांची मल्टिनेशनल कंपन्यानमध्ये निवड

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------




मुंगसे ता. मालेगाव येथील स्वामी विवेकानंद संस्था संस्थेचे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पूल कॅम्पस ड्राईव्ह चे आयोजन करण्यात आले.स्वामी विवेकानंद संस्थेचे सेक्रेटरी आदरणीय श्री. राजेंद्र रामचंद्र सूर्यवंशी हे उपस्थित होते. यांच्या प्रयत्नातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी पूल कॅम्पस ड्राईव्ह चे आयोजन करण्यात आले

पूल कॅम्पस ड्राईव्ह मध्ये glanmark, mylan, lupin,ADF Pvt Ltd, Avlon cosmetics Pvt.Ltd,Mahindra &Mahindra Pvt.Ltd , MSL Driveline System Pvt.Ltd , Bajaj Sons Pvt.Ltd, Abhinav Infotech Pvt.Ltd, Apex international Pvt.Ltd, Distil education and technology Pvt Ltd Nashik.यासारख्या कंपन्यांचा समावेश होता. मुलाखत घेण्यासाठी आलेले कंपन्यांचे HR प्रदीप मोरे, चिंतामण चौहाण , राहुल राठोड आदी उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सेक्रेटरी आदरणीय श्री. राजेंद्र रामचंद्र सूर्यवंशी उपस्थित मान्यवरांचे फुल पुष्प देऊन स्वागत केले. यावेळी स्वामी विवेकानंद संस्थेच्या अध्यक्षा सौ. संगीता राजेंद्र सूर्यवंशी ,स्वामी विवेकानंद संस्थेचे विश्वस्त श्री. सुजित सूर्यवंशी, सौ. रुचिता सूर्यवंशी, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य एम. बी. निकम हे उपस्थित होते.

आदरणीय श्री. राजेंद्र रामचंद्र सूर्यवंशी यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मुलाखतीस प्रोत्साहित केले. यावेळी HR प्रदीप मोरे, यांनी डी . फार्मसी व बी फार्मसी नंतर करिअर व मुलाखतीस कसे समोर जावे यावर मार्गदर्शन करण्यात आले प्रशिक्षण आणि प्लेसमेंट विभागाचे चे प्रमुख प्राध्यापक झाहीद अन्वर यांनी मुलाखत घेण्याची व्यवस्था केली. मुलाखतीसाठी एकूण ५८० मुलांनी ऑनलाईन पद्धतीने अर्ज केले यावेळी ५३० विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी एम. फार्मसी बी.फार्मसी व डी.फार्मसी , बी एस सी नर्सिंग , आय टी आय अंतिम वर्षात असणाऱ्या विद्यार्थ्यांची मुलाखत घेतली यापैकी १८७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये एम फार्मसी चे १२ विद्यार्थी बी फार्मसी चे ७० विद्यार्थी डी फार्मसी चे ४० विद्यार्थी बी एस सी नर्सिंग चे १५ विद्यार्थी तर आय टी आय चे ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली शेवटी सर्व प्रमुख पाहुण्यांचे आभार फार्मसी कॉलेजचे प्राचार्य एम. बी. निकम यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकत्तर कर्मचारी सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# नांदगाव शहरात १६ लाखाचा गुटखा जप्त दोघांना अटकपोलिसांची धडक कारवाई

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



नांदगाव पोलीस ठाणे हद्दीत पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत १६ लाख ३९ हजार रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला असून, संबंधित दोघा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महिंद्रा बुलेरो पिकअप क्रमांक एम एच १९ बी एम ०८२३ ही गाडी बेळगाव येथून नांदगावकडे येत होती. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार या वाहनातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटख्याची वाहतूक केली जात असल्याची शक्यता होती. याअनुषंगाने नांदगाव पोलिसांनी गाडी थांबवून तपासणी केली असता, १६.३९ लाखांचा प्रतिबंधित गुटखा आढळून आला. या प्रकरणात निलेश दिलीपचंद बोथरा व महेश रमेश आहेर, (दोघे रा. विंचूर, ता. निफाड, जि. नाशिक) यांच्याविरुद्ध संबंधित कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, अटक कारवाई सुरू आहे. या यशस्वी कारवाईसाठी पोलीस निरीक्षक प्रीतम चौधरी यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने विशेष मेहनत घेतली. नांदगाव पोलिसांची ही धडक कारवाई स्थानिक गुन्हेगारीवर आळा बसवण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरत आहे.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# पिंपळनेर महाआरोग्य शिबिर संपन्न साक्री तालुक्यातील ५ ते ७ हजार जनतेने शिबिरात उपचाराचा लाभ घेतला

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत





छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे औचित्य साधुन साक्री तालुक्यातील पिंपळनेर येथे शुक्रवार दि. ०६ जुन २०२५ रोजी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन, आमदार साक्री आणी शिवसेना पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिर सपन्न झाले आमदार सौ. मंजुळाताई गावित व शिवसेना जिल्हा प्रमुख यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन, यांच्या सयुक्त विद्यमाने या भव्य-दिव्य आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचा ४६७६ रुग्णांनी लाभ घेतला पैकी ४५७ रुग्णांना संदर्भसेवेसाठी पाठविण्यात आले. ८१२ अस्थिव्यंग रुग्ण ४१६, नंत्ररुग्ण ३४४८ इतर रुग्णांची तपासणी या शिबिरात करण्यात आली. रुग्णांबरोबर त्यांचे नातेवाईक सुध्दा उपस्थित होते. शिबिरात रुग्णांना मोफत औषधे वाटण्यात आली. शिबिरात बालकांची व स्त्रिरोग तपासणी, दंतरोग तपासणी, किडनी तपासणी, नाक-कान तपासणी, मेंदु विकार, त्वचारोग तपासणी, अस्थीरोग तपासणी मोठ्या प्रमाणात करण्यात आली. सर्व प्रकारच्या तपासण्या एकाच ठिकाणी होत असल्याने रुग्णांमधुन समाधान व्यक्त करण्यात आले. शिबिरात शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन, तसेच मुंबई व धुळे येथील तज्ञ डॉक्टरांकडुन तपासणी करण्यात आली. सदर शिबिर एन.एस.पी. विद्यालय (विद्यानंद हायस्कुल) चिकसे रोड पिंपळनेर ता. साक्री येथे संपन्न झाले. या शिबिरासाठी श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय धुळेचे अधिष्ठाता डॉ. सयाजी भामरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगावकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांच्यासह विघ्नहर्ताचे डॉ. यतीन वाघ, डॉ. जितेश चौरे, डॉ. चंद्रकांत खैरनार, डॉ. समाधान देसले, डॉ. मिलींद कोतकर, डी. के. दळवेलकर, डॉ. राहुल तावडे, डॉ. ज्ञानेश्वर पगारे, डॉ. सतिष घरटे, डॉ. हेमंत माळी, डॉ. कल्पेश टाटीया, डॉ. अमोल सोनवणे, डॉ. जीवन शर्मा यांच्यासह जिल्ह्यातील सर्व डॉक्टर्स, नर्स व ब्रदर्स तसेच हॉस्पिटलचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अनमोल सहकार्य लाभले. तसेच शिवसेना पक्षाचे सचिव उत्तर महाराष्ट्राचे संपर्क नेते श्री. भाऊसाहेब चौधरी, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे मंगेश चिवटे व प्रथमेश पाटील उपस्थित होते. साक्री तालुक्यातील आदिवासी पट्ट्यात पिंपळनेर येथे आदिवासी बांधवांसाठी भव्य-दिव्य शिबिराचे आयोजन केल्याबद्दल शिवसेना पक्षाचे सचिव श्री. भाऊसाहेब चौधरी यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी मान्यवर उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे, संपर्कमंत्री दादाजी भुसे पालकमंत्री जयकुमार भाऊ यांचे कडुन आलेले शुभसंदेश वाचुन दाखवीण्यात आले. एन.एस.पी. विद्यालयात आज सकाळी ८ वाजता शिबीराला सुरवात झाली. शिबिराचे उद्घाटन आमदार मंजुळा गावित यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख डॉ. तुळीशराम गावित होते. याप्रसंगी धुळे सिव्हील हॉस्पिटलचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्ता देगावकर, जिल्हा आरोग्य अधिकारी सचिन बोडके, साक्री तहसीलदार साहेबराव सोनवणे, गटविकास अधिकारी श्री. सोनवणे, साक्रीचे डीवायएसपी संजय बंबाळे, एपीआय किरण बर्गे, गट शिक्षणाधिकारी श्री. पगारे, पिंपळनेरचे तहसीलदार शेजवळकर, माजी जि.प. सदस्य गोकुळसिंह परदेशी, माजी जि.प. सदस्य ॲड. एखंडे, शिवसेनेचे जिल्हा सहसंपर्क प्रमुख विशाल देसले, उपजिल्हा प्रमुख ज्ञानेश्वर एखंडे, उपजिल्हाप्रमुख हिम्मत साबळे, राजकुमार पाटील, शिवसेना महिला आघाडी जिल्हाध्यक्षा संगीता पगारे, हभप भालचंद्र दुसाने, साक्री विधानसभा क्षेत्रप्रमुख संभाजी अहिरराव, तालुका प्रमुख पंकज मराठे, अमोल सोनवणे, उपतालुका प्रमुख प्रशांत चौधरी, युवासेना तालुका प्रमुख मंगलदास सूर्यवंशी, युवासेना तालुका प्रमुख तथा लोकनियुक्त सरपंच अजय सोनवणे, युवासेना शहराध्यक्ष तथा नगरसेवक राहुल भोसले, माजी नगरसेवक बाळा शिंदे, शिवसेना आदिवासी आघाडी तालुका अध्यक्ष गोविंदा सोनवणे, शिवसेना तालुका संघटक गोटू चौरे, तालुका समन्वयक चंदू गवांदे, उपतालुका प्रमुख सुरेश अहिरे, ईश्वर माळचे, सागर पाटील, युवासेना उपजिल्हा संघटक शुभम कोठावदे, युवा तालुका संघटक राधे पाटील, युवासेना उपअधिकारी किरण बहिरम, युवासेना क्षेत्रप्रमुख किरण बागुल, जिल्हाप्रमुख किरण अहिरे, विभागप्रमुख श्रीकांत मराठे, विक्की वाघ, अमित सूर्यवंशी, बबलू शेख, अमित सूर्यवंशी, पिंपळनेर शहर प्रमुख भूपेंद्र बैसाने, गण प्रमुख प्रदीप भोये, तालुका संघटक अभय शिंदे, शामशेठ कोठावदे, शिवसैनिक उदय बिरारी, रमेश शिंदे, दीपक पगारे, विभाग प्रमुख धनराज जगताप, आबा पगारे, समर्थ पगारे आदी पदाधिकारी, शिवसैनिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण घरटे, नियोजन तुकाराम बहिरम, ईश्वर ठाकरे यांनी केले.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त म्हसदी येथे वृक्षारोपण वृक्षमित्र सुभानदादा पिंजारी यांचा अनोखा उपक्रम

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत




दि. ५ जून जागतिक पर्यावरण दिनाचे अवचित साधून मसदी येथील निसर्ग प्रेमी श्री सुभान दादा पिंजारी यांनी मुस्लिम कब्रस्तान व आठवडे बाजार परिसरात ५० पेक्षा अधिक वृक्षाची लागवड केली. बाजारपेठेत वनपाल दीपिका अहिरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले तर कब्रस्तान येथे वृक्षमित्र निसर्गप्रेमी श्री सुभान दादा पिंजारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी गावातील अनेक तरुण मित्र वृक्षारोपण करण्यासाठी पुढे सरसावले. निसर्ग प्रेमी श्री सुभान दादा पिंजरा हे अनेक वर्षापासून वृक्ष लागवड करत आहे त्यांच्या हातून हजारो वृक्षांची लागवड झाली त्यांना या वृक्ष लागवडी प्रेम पर्यावरण प्रेमामुळे अनेक संस्थांकडून पुरस्कार देखील प्राप्त झाले आहेत. यावेळी त्यांच्यासोबत वृक्ष लागवड करण्यासाठी गावातील तरुण बांधव महिला भगिनी उपस्थित होत्या त्याप्रसंगी उपस्थित यामध्ये श्री नितीन भदाणे, संदीप शिंदे, संदीप देवरे, सुमनबाई भामरे, आशाबाई भामरे, दौलत शिंदे, सुलताना पटवे, यशवंत देवरे, बोटं पठाण, सोनू देवरे, मिलिंद देवरे, सुनील मिस्त्री, तनवीर पिंजारी, वसीम पिंजारी, वृक्षप्रेमी उपस्थित होते.

# बेटमोगरा येथील जि.प.हा.शाळेच्या सन १९९७ - ९८ मधील १० वी बॅचच्या विद्यार्थी विद्यार्थिनींचा स्नेहमिलन सोहळा उत्साहात संपन्न

## विखुरलेल्या माजी विद्यार्थ्यांचा तब्बल 27 वर्षांनंतर स्नेहमिलन

### सन १९९८ मधील १० वी च्या विद्यार्थी व विद्यार्थिनीनी एकत्र येत दिल्या जुन्या आठवणींना उजाळा

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत



मुखेड तालुक्यातील मौजे बेटमोगरा येथील जिल्हा परिषद हायस्कूल शाळेतील सन १९९७-१९९८ या वर्षीतील इयत्ता १० वी बॅच च्या माजी विद्यार्थी विद्यार्थिनींचा तब्बल २७ वर्षानंतर स्नेहमिलन सोहळा रविवार दि.१ जून २०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या स्नेहमिलन सोहळयामध्ये सन १९९७-१९९८ मधील येथील जि.प.हा शाळेच्या इयत्ता १० वी तील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते. बेटमोगरा येथील जिल्हा परिषद हायस्कूल शाळेमध्ये येथील शिक्षण पूर्ण करून बाहेरगावी इतरत्र मोठमोठ्या व्यवसायावर, नोकरीवर गेलेल्या विद्यार्थ्यांनी व्हाट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून एकत्र भेटायचे ठरवले. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद हायस्कूल शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी तब्बल २७ वर्षानंतर बेटमोगरा येथे आपल्या जुन्या शाळेत एकत्रित जमले. विशेष म्हणजे या कार्यक्रमाला केवळ वर्गमित्रच नाही तर, त्यांना शिकवणार्या शिक्षकांनाही आमंत्रित करण्यात आले होते. हा कार्यक्रम अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात अतिशय रंगतदार पद्धतीने पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बेटमोगरा येथील श्री शिवलिंग बादशहा मठ संस्थान चे मठाधीश श्री.सिद्धदयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी शिक्षक, श्री.चांडोळकर गुरुजी, श्री. दमकोंडवार गुरुजी, श्री.सकिनवार सर, श्री.उकादौडे सर, श्री. भिसे सर, मठपती सर, बहिरवाड, बतकुलवार सर, योगेश्वर महाराज, श्री.मोहन मामा (माजी सेवक), मौला मामा (सेवक), इत्यादींची यावेळी उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख सलीम रज्जाकसाब, संदीप शिवराज पाटील बेटमोगरेकर, यशवंत सोनकांबळे, प्रल्हाद यरपलवाड, संजय नुकुलवार, सुरेश सोनकांबळे, व्यंकट पाटील, मधुकर पिटलेवाड, बाळू ढेकळे, बाळू वाडेकर, मारोती मादाळे, शंकर तळणे सह सन १९९८ मधील १० वी च्या बॅच मधील माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनीची मोठ्या संख्येने उपस्थित होते.या स्नेहमिलन सोहळ्या दरम्यान साने गुरुजी यांच्या खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे या सुंदर कविते चे स्मरण करण्यात आले.

**१ जून २०२५ चा दिवस बेटमोगरा येथील जि.प.हा.शाळेच्या सन १९९८ मधील इयत्ता १० वी.च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळ्याचा दिवस आमच्यासाठी अत्यंत आनंददायी आणि अविस्मरणीय ठरला.तसेच हा स्नेहमिलन सोहळा यशस्वीपणे पार ही पडला. आपल्या बालपणातील आठवणींना उजाळा देण्यासाठी आणि जुन्या मित्र-मैत्रिणींसोबत पुन्हा एकदा हसण्याचा, बोलण्याचा आणि जुन्या दिवसांच्या आठवणींमध्ये रमण्याचा हा क्षण किती खास होता, हे शब्दात मांडणे कठीण आहे.**

**सलीम रज्जाकसाब शेख जि.प.हा.शाळा बेटमोगरा**
**सन १९९८ तील १० वी.बॅच चे माजी विद्यार्थी**

**या स्नेहमिलन सोहळ्याच्या निमित्ताने आपल्या जीवनात मार्गदर्शक ठरलेल्या सर्व आदरणीय गुरुजनांना पुन्हा भेटण्याची संधी मिळाली. त्यांच्या शिकवणीमुळे आज आपण प्रत्येकजण आयुष्यात यशस्वीपणे उभे राहिलो आहोत. त्यांच्या आशीर्वादाने आणि मार्गदर्शनाने आपण जे काही साध्य केले आहे, त्याची जाणीव करून दिल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार. आपल्या सहकारी मित्र-मैत्रिणींसोबत बालपणातील गमतीजमती, अभ्यासाचे तास, खेळ, आणि त्यावेळच्या सोबतीच्या आठवणी पुन्हा एकदा अनुभवायला मिळाल्या. हे स्नेहमिलन केवळ आनंदाचा ठेवा नव्हे, तर जुन्या नात्यांना पुन्हा बळ देण्याचे एक सुंदर माध्यम ठरले.**

**प्रा.संदीप शिवराज पाटील बेटमोगरेकर**
**जि.प.हा.शाळा बेटमोगरा**
**सन १९९८ तील १० वी.बॅच चे माजी विद्यार्थी**

# सुधाकर बडगुजर समर्थकांविरुद्ध गुन्हा – भाजप आमदाराची बदनामी

**शैलेश रौंदळ**
**नाशिक प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**



नाशिक पश्चिम विधानसभा मतदार संघातील भाजप आमदार सीमा हिरे यांना लक्ष्य करणारे आक्षेपार्ह संदेश समाज माध्यमात टाकून दोन पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी शिवसेनेतून (उध्दव ठाकरे) हकालपट्टी केलेले उपनेते सुधाकर बडगुजर यांच्या तीन समर्थकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत भाजपचे पदाधिकारी राकेश ढोमसे यांनी तक्रार दिली. अंकुश शेवाळे, धिरज राजपूत आणि गणेश दराडे अशी संशयितांची नावे असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. ठाकरे गटातून हकालपट्टीनंतर बडगुजर हे भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या मार्गावर आहेत. बडगुजर यांच्यावर १७ गुन्हे दाखल असून कारवाई टाळण्यासाठी ते भाजपमध्ये येण्याची धडपड करीत असल्याचे पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. बडगुजर यांच्या प्रवेशाला भाजपमधून विरोध होत आहे. अशी परिस्थिती असताना बडगुजर समर्थक अंकुश शेवाळेसह अन्य दोन साथीदारांनी समाज माध्यमात आक्षेपार्ह संदेश टाकले. दोन पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद निर्माण करण्याच्या उद्देशाने हे संदेश टाकल्याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी संशयितांवर कारवाईची तयारी पोलिसांनी सुरू केली आहे.

# नाशिक जिल्ह्यात वऱ्हाडाला अपघात – आठपेक्षा अधिक जण जखमी

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



दिंडोरी तालुक्यातील जऊळके वणी शिवारात लग्नाचे वऱ्हाड घेऊन निघालेले मालवाहू वाहन उलटल्याने आठ ते १० जण जखमी झाले. यात अधिक्याने महिला आहेत. सिमेंट काँक्रिट रस्त्याच्या बाजूच्या कडा न भरल्याने एकाचवेळी दोन वाहने मार्गस्थ होताना अडचणी येतात. समोरील वाहनाला जागा देण्याच्या प्रयत्नात हा अपघात झाल्याचे सांगितले जाते. दिंडोरी तालुक्यातील अक्राळे गावातून लग्नासाठी सुमारे २५ जणांचे वऱ्हाड शुक्रवारी दुपारी मालवाहू वाहनाने जऊळके वणी येथे निघाले होते. कादवा साखर कारखाना रस्त्याने जात असताना समोरून आलेल्या वाहनास जागा देताना चालकास रस्त्याच्या कडांचा अंदाज न आल्याने मालवाहू वाहन उलटले. या अपघातात गायत्री लिलके (२१), सुनीता कोरडे (३२), सविता आचारी (३५), सुनीता बेंडकुळे (३२), अलका दाभाडे (३५), माधव आचारी (५५) यांच्यासह आठ ते १० जण जखमी झाले. संबंधितांना पिंपळगाव बसवंत येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती स्थानिकांनी दिली. अलीकडेच हा काँक्रिटचा रस्ता तयार करण्यात आला आहे. परंतु, उंच झालेल्या रस्त्याच्या कडा योग्य प्रकारे भरल्या गेलेल्या नाहीत. परिसरातील अन्य सिमेंटच्या रस्त्यावर यापेक्षा वेगळी स्थिती नाही. परिणामी हे रस्ते अपघातांना निमंत्रण देणारे ठरत असून वारंवार अपघात होत असल्याकडे ग्रामस्थांनी लक्ष वेधले. रस्त्याच्या कडा न भरल्याने एकाच वेळी दोन वाहने समोरासमोर आल्यास अपघात होण्याचा धोका असतो. साखर कारखाना सुरू झाल्यानंतर ऊस वाहतूक सुरू होईल. त्यामुळे विद्यार्थी, पादचारी व स्थानिक वाहनधारकांना अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे.


## शतायुषी हो बाळा..

**दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....**

**आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह**

**आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७**